# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### डहाणू व तलासरी (जि.ठाणे) तालुक्यात आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांची संख्या वाढविण्याबाबत

**(१) १९०२९ (३१-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व तलासरी (जि.ठाणे) तालुक्यात दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याने येथे आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहे वाढविण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक यांचेकडून सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२२-०५-२०१८) :** (१) डहाणू, तलासरी (जि.ठाणे) तालुक्यात वसतीगृह सुरू करण्याची लोकप्रतिनिधींची मागणी प्राप्त झाली आहे.

(२) वसतींगृहासाठी शहरामध्ये जागा मिळविणे, बांधकाम करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, तसेच भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्याऐवजी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच जिल्हा परिषदांच्या काही शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वीचे वर्ग सुरू करण्यात आले असून आश्रमशाळांमध्येही श्रेणीवाढ व तुकडीवाढ करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फेपरवाडा (ता.मारेगांव, जि.यवतमाळ) येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील कपाशी पिकावर विद्युतवाहक तार पडल्याने शेतमालाचे झालेले नुकसान**

**(२) ३७११० (१८-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फेपरवाडा (ता.मारेगांव, जि.यवतमाळ) येथील पांडुरंग नरारी मुसळे यांच्या शेतातील कपाशी पिकावर विद्युतवाहक तार पडल्याने त्यांचे शेतमालाचे नुकसान झाल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पांडुरंग मुसळे यांनी शेतातील कपाशीच्या नुकसानाबाबत तहसिलदार व संबंधित अधिका-यांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीनुसार शेतातील कपाशीच्या झालेल्या नुकसानाची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
सदरची घटना दिनांक २६.०९.२०१५ रोजी घडली होती.
(२) हे खरे आहे.
(३) यवतमाळ जिल्ह्यातील मारेगांव तालुक्यातील फेफरवाडा येथील श्री.पांडुरंग लटारी मुसळे यांच्या शेतातील कपाशी पिकांवर भारीत विद्युत तार पडून झालेल्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई देण्याकरिता संबंधिताकडून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता, वारंवार तोंडी व लेखी विनंती करुनसुध्दा करण्यात न आल्यामुळे महावितरण कंपनीकडून अद्याप नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा तालुक्यातील (जि.जळगांव) हातेड व वैजापूर येथील शासकीय आश्रमशाळेतील असुविधांबाबत**

**(३) ४४६८४ (२९-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यातील (जि.जळगांव) हातेड व वैजापूर येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बसण्याची योग्य व्यवस्था नसणे, हॉलच्या खिडक्यांची तावदाने तुटलेली असणे या व अशा इतर सुविधांचा अभाव असल्याने संबंधित आश्रमशाळेचे अनुदान थांबविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित गैरसोयीस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, वैजापूर येथे सद्यस्थितीत १० स्नानगृहे व १० शौचालय उपलब्ध आहेत. स्नानगृहाची दुरूस्ती करण्यात आली असून स्नानगृहे व शौचालय विद्यार्थ्यांच्या वापरात आहेत. नवीन इमारत बांधकामाची अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

---

## कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष जोडभार, प्रत्यक्ष वापर आणि त्यांना देण्यात येणारी वीज देयके याबाबत अभ्यास करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या समितीबाबत

**(४) ४७१२२ (२०-०४-२१०६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी ग्राहकांना प्रत्यक्ष होणारा वापर आणि त्यांना देण्यात येणारी वीज देयके याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी म.रा.वि. मंडळ सूत्रधारी कंपनी अंतर्गत तज्ञ व्यक्तींच्या समितीची नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीतील तज्ञ हे कंपनीतील असल्याने अद्याप अभ्यास पूर्ण केला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, झालेला गैरप्रकाराकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शेतक-यांची फसवणूक करणा-या व कंपनीला गैरप्रकारे महसूल मिळवून देणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) तसेच गैरप्रकारची निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी शासन त्रयस्त उच्चस्तरीय यंत्रणेद्वारे चौकशी करणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर समितीमध्ये महावितरण कंपनीच्या एकही अधिकारी/कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०२१-२२ पर्यंत सर्वांसाठी वीज मिळेल या उद्देशाने ॲक्शन प्लॅन तयार करण्याबाबत**

**(५) ४८६५६ (२०-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने अलिकडेच राष्ट्रीय वीज धोरणांमधील सुधारणांना मंजूरी दिलेली असून या धोरणानुसार सन २०२१-२२ पर्यंत सर्वांसाठी वीज मिळेल या उद्देशाने ॲक्शन प्लॅन बनवण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य वीज नियमक आयोगाला माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात दिले असून राज्यातील अनेक ठिकाणी ३० वर्षापासून अधिक जुन्या संचाच्या ठिकाणी या निर्णयाचा लाभ होणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे व केंद्र शासनाच्या आदेशानुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) राष्ट्रीय वीज दर धोरणातील मुद्दा क्र.८ मधील चौथ्या परिच्छेदानुसार विद्युत नियामक आयोगाने राज्यात सन २०१२-२२ पर्यंत २४ तास वीज पुरवठा उपलब्धता होण्यासाठी आराखडा तयार करणे अपेक्षित आहे.
विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ६२ व ६३ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींअंतर्गत वीज वितरण कंपनी वीज खरेदी करु शकते. त्याप्रमाणे वितरण कंपनी आपल्या बहु-वर्षिय वीज दर याचिकेत नजीकच्या भविष्यातील वीजेची मागणी कोणत्या स्त्रोत्रातून पूर्ण करेल याचा तपशील सादर करत असते. या वीज खरेदीच्या आराखडयास आयोग नियामक प्रक्रियेनुसार वेळोवेळी मंजुरी देते.
(२) महाराष्ट्रात सद्यपरिस्थितीत पुरेशी वीज उपलब्धता असल्याने शेती पंप सोडून इतर कोणत्याही ग्राहकांस पूर्वनियोजित भारनियमन केले जात नाही. शिवाय आयोग वेळोवेळी लागणारी अतिरिक्त वीज मंजूर करते. राज्य शासनाच्या पाण्याचा योग्य वापर करण्याच्या धोरणानुसार, आयोगाने आपल्या भारनियमनाच्या आदेशाव्दारे स्वतंत्र कृषी वाहिनीवर असणाऱ्या कृषी पंपाना ८ ते १० तास वीज उपलब्ध करुन देण्याचे ठरवून दिले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नादुरुस्त वीज ट्रान्सफार्मर त्वरित दुरुस्त करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी महावितरण कंपनी मार्फत ट्रान्सफॉर्मर शेड उभारण्याचा घेतलेला निर्णय**

**(६) ५५२३६ (१६-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नादुरुस्त वीज ट्रान्सफॉर्मर त्वरित दुरुस्त करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी महावितरण कंपनी मार्फत ट्रान्सफॉर्मर शेड उभारण्याचा निर्णय माहे मे, २०१६ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सुरवातीला कोणते तालुके या योजनेसाठी निवडण्यात आले आहेत,

(३) असल्यास, ट्रान्सफार्मर शेड उभारण्यासाठी लागणाऱ्या निधीची व्यवस्था महावितरण कंपनी मार्फत करण्यात येणार आहे काय व प्रत्येक तालुक्यासाठी किती निधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) ज्या तालुक्यात रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण जास्त आहे, अशा एकूण ५० तालुक्यांची निवड पहिल्या टप्प्यात करण्यात आली आहे.

(३) प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उभारणी करण्यात येणाऱ्या रोहित्र भवनासाठी रुपये ५२.३५ लक्ष निधी लागणार आहे. सदरहू कामाच्या निविदांची विभागणी चार भागांमध्ये करण्यात आलेली आहे. १) स्थापत्य, २) साहित्य पुरवठा, ३) रोहित्र दुरुस्ती व ४) साहित्य पुरवठा व रोहित्र दुरुस्ती. पहिल्या टप्प्यामध्ये ट्रान्सफॉर्मर उभारणीकरिता लागणाऱ्या निधीची तरतूद महावितरण कंपनीकडून करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशनद्वारा मेट्रो प्रकल्पाला सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याच्या मागणीबाबत**

**(७) ५९४०० (१६-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशनद्वारा मेट्रो प्रकल्पाला सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री (उर्जा) राज्यमंत्री (उर्जा), प्रधान सचिव (उर्जा) संबंधित वीज नियामक मंडळ तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि टाटा पॉवर कार्पोरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास संबंधित यंत्रणा व मंत्रालयीन विभागाकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास प्रश्नोक्त भाग (१) प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) भारतीय विद्युत कायदा-२००३ मधील तरतुदीस अनुसरुन महापारेषण कंपनीअंतर्गत राज्य पारेषण उपक्रमातर्फे वीज उत्पादक कंपन्या/मोठे वीज ग्राहक यांना निर्मित वीजेचे निष्कासन करण्यासाठी/वीजेचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असणारी ग्रीड जोडणी (Grid Connectivity) संबंधित वीज कंपनीच्या पारेषण विभागातर्फे विहित नमुन्यात अर्ज केल्यावर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर दिली जाते. त्यास अनुसरुन मे. टाटा पॉवर कंपनी (पारेषण) यांनी केलेला अर्ज व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर, राज्य पारेषण उपक्रमाने त्यांच्या दि. ०१.०१.२०१८ च्या पत्रान्वये, त्यांना मेट्रो-३ (कोलाबा-वांद्रा-सिप्झ) करिता सुमारे ९० मे. वॅट वीज पुरवठा करण्याबाबतची ग्रीड जोडणी मंजुरी दिली आहे.

सदर प्रकल्पास सन २०१९ पासून २०३१ पर्यंतच्या कालावधीकरिता टप्प्याटप्प्याने लागणाऱ्या विद्युत भाराबाबतचा प्रस्ताव असून त्यासाठी मा.वीज नियामक आयोगाने त्या त्यावेळी निर्धारित केलेल्या दराने विद्युत पुरवठा केला जाईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळांतील शिक्षक संवर्गातील रिक्त पदांवर तासिका तत्त्वावरील सुमारे १२८९ कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(८) ६४५९१ (१२-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आश्रमशाळांतील शिक्षक संवर्गातील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्त्वावरील सुमारे १२८९ कर्मचाऱ्यानी शासन सेवेत तातडीने कायम करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने संबधित कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे:
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :**(१), (२) व (३) राज्यातील आदिवासी विभागातंर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक संवर्गातील तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांवर तात्पुरती व्यवस्था म्हणून तासिका तत्वावर शिक्षकांची तसेच रोजंदारीवर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची तात्पूरता स्वरूपात नेमणूक केली जाते. सदर शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास यांनी

शासनास सादर केला आहे. रोजंदारी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याच्या अनुषंगाने याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व प्रचलित धोरणातील तरतूदी तपासून निर्णय घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

**नाशिक व ठाणे विभागात शासनाच्या आदिवासी विभागांतर्गत नियमबाह्यरित्या मुख्याध्यापकांमार्फत रेनकोट खरेदीचे आदेश जारी केल्याबाबत**

**(९) ६७७६१ (११-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक व ठाणे विभागात शासनाच्या आदिवासी विभागांतर्गत प्रशासनाने पावसाळयाचे कारणे पुढे करत नियमात बसत नसतानाही थेट मुख्याध्यापकांमार्फत रेनकोट खरेदीचे आदेश जारी केले असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे आदेश वादात सापडून न्यायालयानेच त्याला स्थगिती दिल्यामुळे सुमारे दोन लाख आदिवासी विद्यार्थी रेनकोटपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०५-२०१८) :** (१) व (२) शासन पत्र दि.१६.०६.२०१६ अन्वये शासकीय आश्रमशाळेतील मुख्यापकांना रुपये ३.०० लक्ष पर्यंत वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून रेनकोट खरेदीसाठी मान्यता देण्यात आली होती. परंतु सदर खरेदी प्रक्रिया रद्द करुन मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासकीय आश्रमशाळेतील सर्व प्रकल्प कार्यालय स्तरावर अल्प मुदतीची ई-निविदा प्रक्रिया राबवून रेनकोट पुरवठा करण्यांत आलेला आहे. सन २०१७-१८ पासून रेनकोट खरेदी बंद करण्यांत येऊन विद्यार्थ्यांना थेट निधी देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अमृत आहार व शालेय साहित्याचे वाटप न झाल्याबाबत**

**(१०) ७१७९२ (११-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माहे मे, २०१६ पासून अंडी, केळी आणि दूध यांचे वाटप बंद असून, गणवेश व शालेय साहित्याचे वाटपही अद्यापी झालेले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अंडी, केळी आणि दूध यांचे वाटप तसेच गणवेश व शालेय साहित्याचे वाटप तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मे, २०१६ मध्ये शासकीय आश्रमशाळांना उन्हाळी सुट्टी असल्याने सदर महिन्यात पुरवठा झालेला नाही. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना अंडी, केळी, दूध तसेच गणवेश व शालेय साहित्यांचा पुरवठा करण्यात आला आहे.

---

## औंढा नागनाथ परिसरातील जलालदाभा येथील शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीविना नादुरूस्त रोहित्र काढून नवीन रोहित्र बसविल्याबाबत

**(११) ७२०५९ (२७-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ परिसरातील जलालदाभा येथील एकूण २० ते २५ शेतक-यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून नादुरूस्त रोहित्र काढून नवीन रोहित्र बसविला मात्र वीज कंपनीचा एकही कर्मचारी फिरकला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विजे अभावी पिकांना पाणी देता येत नसल्याने पिके सुकुन जात असल्यामुळे तेथील शेतक-यांनी त्यांचा जीव धोक्यात घालून रोहित्र बसविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीवर तेथील शेतक-यांनी व ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रोहित्र दुरुस्ती वेळेवर होण्याबाबत शासनाने कोणती काय कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) मौजे जलालदाभा येथील ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे एक कृषी रोहित्र दिनांक १५.०८.२०१६ या वशी नादुरुस्त झाले. सदर नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी त्या परिसरातील महावितरणचे स्थानिक जनमित्र व इतर कर्मचाऱ्यांनी दिनांक २१.०८.२०१६ रोजी ११ के.व्ही. पिंपळदरी कृषी वाहिनीवर नवीन ६३ के.व्ही.ए.चे रोहित्र बसविण्यासाठी नेले. या कर्मचाऱ्यासोबत तेथील स्थानिक शेतकरी सोबत होते. सदर रोहित्र दिनांक २१.०८.२०१६ रोजी नव्याने बदलण्यात आले.

महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सदर रोहित्र बसवितांना शेतकऱ्यांनी सहकार्य केल्याचे कळविले आहे. यामध्ये कोणत्याही शेतकऱ्याचा जीव धोक्यात घालून नादुरुस्त रोहित्र बसविलेले आढळून येत नाही. सद्यस्थितीत मौजे जलालदाभा येथील वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयात महावितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आलेल्या असतानाही कृषि पंपासाठी वीज जोडणी करून देण्यात आलेली नसल्याबाबत**

**(१२) ७२८३६ (१०-०१-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने प्रत्येक शेतकऱ्याला कृषि पंपासाठी वीज जोडणी करून देण्याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना केलेल्या असूनही जोडणीची रक्कम भरूनही मागील अनेक दिवसांपासून शेतकऱ्याला कृषि पंपासाठी वीज जोडणी करून देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील कृषीपंपाची २८ हजार ७८० वीजजोडणी ठेकेदारांच्या बेजबाबदार कारभारामुळे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज जोडणी करून न देणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यात मार्च २०१६ अखेर १,७०,४९१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत (कृषीपंप अनुशेष, विशेष योजना, जिल्हा वार्षिक नियोजन व पायाभूत आराखडा-२ इ.) १,२५,५५२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. तसेच सन २०१७ -१८ मध्ये ६६,१७४ इतक्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

मराठवाड्यात मार्च २०१६ अखेर २९,१११ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत (विशेष योजना, जिल्हा वार्षिक नियोजन व पायाभूत आराखडा-२ इ.) २१,७३३ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. तसेच सन २०१७ -१८ मध्ये ९,१९२ इतक्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१ तिरोडा (जि.गोंदिया)**
**प्रकल्पाचे भारनियमन बंद करण्याबाबत**

**(१३) ७२८९३ (१०-०१-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा -१ तिरोडा (जि.गोंदिया) सिंचन क्षमता ६७०० हेक्टर असून सध्या खरीपासाठी- २२०० हेक्टर व रब्बीसाठी - १३०० हेक्टर झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची विद्युत देयकांची माहे सप्टेंबर २०१६ मध्ये पूर्ण थकबाकी भरुनही व चालु देयकांचा नियमित भरणा करीत असूनही प्रकल्पाचे भारनियमन ८ ते १६ तास केले जात असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, सिंचन क्षमता वाढविण्याकरीता व भारनियमनामुळे पिकांचे नुकसान टाळण्याकरीता सदर प्रकल्पाचे भारनियमन शासन बंद करणार आहे काय ,
(४) असल्यास, नियमित विद्युत देयक भरणाऱ्या प्रकल्पाचे भारनियमन बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) व (२) धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१ तिरोडाचा वीजपुरवठा एक्सप्रेस वाहिनीवर असल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या मंजुरीनुसार महावितरण कंपनीचे परिपत्रक दिनांक १४.०१.२०१३ अन्वये, दर दिवशी १६ तास सलग वीज पुरवठा देण्यात येतो आणि आठवड्यातून एक दिवस (Staggering) वीज पुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येतो.
(३) उपसा सिंचन योजनेचा वीज पुरवठा एक्सप्रेस वाहिनीवर असल्यास व थकबाकी शून्य असल्यास उपसा सिंचन योजनेला आवर्तन कालावधीत २४X७ वीज पुरवठा करता येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना विद्युत जोडणी देतांना भावंडाची सातबाऱ्यावरील**
**इतर पूर्वसंमतीची अट रद्द करण्याबाबत**

**(१४) ७३०४७ (०७-०१-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मोठ्या प्रमाणावर देण्याबाबत शासनाचे धोरण असून विद्युत जोडणी देण्यापूर्वी सातबाऱ्यावर नाव असणाऱ्या त्या शेतकऱ्यांच्या इतर भावंडांची पूर्व परवानगी घेणे विद्युत विभागाने अनिवार्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलह असणाऱ्या परिवारातील शेतकरी बांधवांना आपल्याच भावंडांकडून पूर्व परवानगी न मिळाल्यास विद्युत विभागाकडून विद्युत जोडणी करून दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा शेतकऱ्यांना विद्युत जोडणी करतांना आपल्या भावंडाची घ्यावयाची पूर्वसंमतीची अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील १५० शाळांमध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाल्याबाबत**

**(१५) ७४३३९ (२८-११-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील सुमारे १५० शाळांनी विद्युत देयक न भरल्याने तेथील विद्युत पुरवठा माहे जानेवारी, २०१७ मध्ये खंडीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिनांक ११ ते १७ जानेवारी, २०१७ या कालावधीत विद्युत सुरक्षा सप्ताह राबविण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्युत विभागाने सदर शाळांचा विद्युत पुरवठा पुर्ववत सुरू होणेकरीता निर्देश दिले आहेत काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) नागपूर जिल्ह्यातील एकूण १६ शाळांची विद्युत बिलाची थकबाकी असल्याने विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.
(२) दि. ११.०१.२०१७ ते १७.०१.२०१७ या कालावधीत सुरक्षा सप्ताह राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते.
(३) नाही.
(४) व (५) नागपूर शहर मंडळांतर्गत १७ शाळांवर वीजबीलाच्या थकबाकीमुळे महावितरण कंपनीने नियमानुसार नोटीस देऊन विद्युत पुरवठा खंडीत केला आहे. त्यापैकी एका शाळेने दिनांक ३१.०१.२०१७ रोजी थकित बिलाचा भरणा केल्यामुळे त्याचा विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. नागपूर ग्रामीण मंडळांतर्गत जानेवारी, २०१७ मध्ये एकूण ६ शाळांवर

महावितरण कंपनीने नियमानुसार नोटीस देऊन विद्युत पुरवठा खंडीत केला होता. त्यापैकी एका शाळेने दिनांक ३०.०१.२०१७ रोजी थकित बिलाचा भरणा केल्यामुळे त्याचा विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

---

**पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागात नागरिकांनी पैसे भरून सुद्धा मिटर अभावी जोडणी मिळत नसल्याबाबत**

**(१६) ७५०६८ (२८-११-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांनी पैसे भरून सुद्धा महावितरणकडून विद्युत मिटरचा तुटवडा असल्या कारणास्तव मिटर अभावी जोडणी मिळत नसल्यामुळे नागरिकांना अंधारातच राहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नादुरूस्त मिटर बदलून मिळत नसल्यामुळे विज देयकात जास्त आकारणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता, महावितरण, भिंगारी यांच्या कार्यालयावर वारंवार नागरिकांनी मोर्चे काढून सुद्धा कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी नवीन मिटर उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नवीन विद्युत मीटरचा तुटवडा नसून नवीन वीज जोडणी देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीकडून सुरु आहे.

(२) हे खरे नाही. जानेवारी, २०१७ मध्ये पनवेल-२ उपविभागात २६० मीटर्स बदलण्यात आले आहेत व पनवेल (शहर) विभागात ५३७ मीटर्स बदलण्यात आले असून उर्वरित वीजग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**पुणे शहरात महावितरणामार्फत नव्याने नियमावलीनुसार थकीत असलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम वसूल करण्याबाबत**

**(१७) ७६६२२ (२८-११-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महावितरणच्या नवीन जोडणी, ट्रान्सफॉर्मर बसविणे, ट्रान्सफॉर्मर बदलणे याबाबतची कोटयावधी रुपयांची रक्कम ग्राहकांकडे थकीत असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नवीन नियमावलीनुसार थकीत असलेली कोटयावधीची रक्कम वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महावितरणकडून नवीन जोडणी देताना सेवाजोडणी आकार, सुरक्षा ठेव आदींचा समावेश असलेले फर्म कोटेशन ग्राहकांना दिले जाते व या कोटेशनची रक्कम भरल्यानंतरच ग्राहकांना जोडणी देण्यात येते. त्यामुळे नवीन जोडणीसाठी ग्राहकांकडे थकबाकी नाही. तसेच ट्रान्सफॉर्मर बसविणे, ट्रान्सफॉर्मर बदलणे यासाठी ग्राहाकांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. त्यामुळे यासाठीची ग्राहकांकडे कोणतीही थकबाकी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही..

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय अनुदानित आश्रमशाळामध्ये त्रिस्तरीय यंत्रणा स्थापन करण्याबाबत**

**(१८) ७७१८२ (२१-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेंद्र पाटणी**

**(कारंजा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी प्रशासकीय स्तरावर त्वरित कार्यवाही होण्यासाठी आपत्कालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती आणि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय अनुदानित किती आश्रमशाळामध्ये समिती स्थापन करण्यात आली व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०५-२०१८) :** (१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दि.२८.१२.२०१६ अन्वये आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी प्रशासकीय स्तरावर कार्यवाही होण्यासाठी आपत्कालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती आणि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यांत आल्या.

(२) अपर आयुक्त, नाशिक विभागांतर्गत २२२ शासकीय आश्रमशाळा व २२१ अनुदानित आश्रमशाळांकरीता समित्या स्थापन करण्यांत आल्या.

अपर आयुक्त, अमरावती विभागांतर्गत ८१ शासकीय आश्रमशाळा व १२२ अनुदानित आश्रमशाळांकरीता समित्या स्थापन करण्यांत आल्या.

अपर आयुक्त, ठाणे विभागांतर्गत १२८ शासकीय आश्रमशाळा व ७२ अनुदानित आश्रमशाळांकरीता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

अपर आयुक्त, नागपूर येथील आपत्कालीन आढावा गट/वैद्यकीय सामाजिक आढावा समिती तालुकास्तरावर गठीत करण्यात आली व जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यांत आली आहे.

शासकीय आश्रमशाळा/अनुदानित आश्रमशाळेच्या ठिकाणी विद्यार्थी मृत्यूची घटना घडल्यानंतर आपत्कालीन आढावा गट समितीकडून घटनास्थला भेट देऊन प्राथमिक चौकशी करण्यांत येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्हयातील विजेसर्दभात पायाभुत सुविधा निर्माण करणेबाबत

**(१९) ८११३१ (२८-११-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील विजे संदर्भातील पायाभुत सुविधा निर्माण करण्याच्या उदेशाने शासनाच्या इन्फ्रा २ या योजने अंतर्गत गतवर्षापासुन सुरु असलेली सर्वच कामे विहित मुदतीत पुर्ण न होता रेंगाळली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी घरगुती विजेसोबतच कृषीपंपासाठी लागणा-या विजेचा पुरवठा करतांना महावितरणला मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेवुन सदर कामाची गती न वाढविणा-या कंत्राटदारावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वाशिम जिल्ह्यातील पायाभूत आराखडा-२ या योजनेचे कंत्राट महावितरण कंपनीमार्फत मे. कस्तुम इंजिनिअर्स, औरंगाबाद या कंपनीस दिनांक ०६.०९.२०१४ रोजी टर्न की तत्वावर देण्यात आले होते. सदर कंत्राटदाराने मासिक उद्दीष्टानुसार काम न केल्यामुळे त्यांना दोन वेळा नोटीस टु करेक्ट देण्यात आली. तसेच मार्च-२०१६ मध्ये रु.१८.७९ कोटींची कामे त्यांच्याकडून काढून घेऊन मंडळ स्तरावर त्या कामाच्या निविदा काढून दुसऱ्या कंत्राटदारांना ती कामे देण्यात आली असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत. यानंतरही कामाची प्रगती समाधानकारक नसल्यामुळे आणखी रु. २८.५७ कोटींची कामे ऑक्टोबर, २०१६ मध्ये कंत्राटदाराकडून काढून त्या कामाच्या निविदा मंडळ स्तरावर काढण्यात आल्या असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. मे. कस्तुम इंजिनिअर्स यांना मासिक उद्दिष्टानुसार काम न केल्यामुळे कंत्राटाच्या नियमाप्रमाणे त्यांच्याकडून दंड आकारण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अचलपूर विभागाचे विभाजन करून नवीन दर्यापूर विभाग निर्माण करण्याबाबत

**(२०) ८१२८७ (२८-११-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (जि.अमरावती) विद्युत विभागांतर्गत ६८१ खेडी समाविष्ट असून ७ उपविभाग, ४० वितरण केंद्र, २६ उपकेंद्रे यात समाविष्ट आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रचंड भौगोलिक आकारामुळे या विभागातील जनतेच्या तक्रारींना योग्य न्याय मिळत नसल्यामुळे अचलपूर विभागाचे विभाजन करून नवीन दर्यापूर विभाग निर्माण करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीने स्वीकृत केलेल्या सुधारीत मानकानुसार नवीन विभाग निर्माण करण्यासाठी प्रस्तावित विभागांतर्गत वीज ग्राहकांची संख्या किमान १,२०,००० किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. मुख्य अभियंता, अमरावती परिमंडळ, अमरावती यांच्या प्रस्तावानुसार अचलपूर विभागाचे विभाजन केल्यास विद्यमान विभाग, अचलपूर व प्रस्तावित विभाग दर्यापूर ही दोन्ही विभाग कार्यालय वीज ग्राहकाचा निकष पूर्ण करीत नाही. परंतु महावितरण कंपनीने सद्यस्थितीत नवीन कार्यालय निर्मितीची मानके निश्चित करण्यासाठी नव्याने प्रक्रिया सुरु केलेली असून नवीन मानके प्रसृत केल्यानंतर सदर प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन महावितरण कंपनीकडून विभाजनाबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था धामणगाव रेल्वे या इमारतीच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(२१) ८१७०९ (२१-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था धामणगाव रेल्वे इमारत बांधकामाकरिता जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक १८ डिसेंबर,२०१४ रोजीचे आदेशानुसार तहसील कार्यालय धामणगाव रेल्वे या इमारतीवरील दुसऱ्या मजल्यावर बांधाकामाकरिता जागा मंजुर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था धामणगाव रेल्वे कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करुन शासनाकडून निधी प्राप्त होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव व निधी मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगांव रेल्वे यांच्या कार्यालयाच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता आणि अंदाजपत्रक सन २०१६-१७ व निधिचा प्रस्ताव जा.क्र. १६६१/२०१६, दि. १८.१२.२०१६ रोजी मंजुरीस्तव सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, धामणगांव रेल्वे यांचेकडे सादर करण्यात आला आहे. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धामणगांव रेल्वे यांनी सदरचा प्रस्ताव दि. २.०१.२०१७ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे मंजूरीस्तव सादर केला होता. कार्यकारी

अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांनी दि. ५.०१.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे प्राथमिक अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केलेला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ३१.०१.२०१७ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे सादर केला होता. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी प्रधान सचिव, महसूल यांचेकडे दि. ३.०३.२०१७ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरातील इरई नदीवर विजेच्या खांबामुळे विद्युत शॉक लागून युवकाच्या मृत्यु झाल्याबाबत

**(२२) ८१७८९ (२८-११-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील इरई नदीवर विजेच्या खांबामुळे विद्युत शॉक लागून युवकाचा मृत्यु झाला असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, युवकांच्या कुटुंबीयांना कोणत्या स्वरूपाची आर्थिक मदत शासनाने केली तसेच मृत्यूस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
सदर अपघात दि. २२.०४.२०१६ रोजी घडला असून त्याचवेळेस निदर्शनास आला आहे.
(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, चंद्रपूर कार्यालयामार्फत दिनांक २५.०४.२०१६ रोजी करण्यात आली असून चौकशीत चंद्रपूर महानगरपालिकेच्या सदोष पथदिव्यांच्या वीजसंच मांडणीमुळे सदर अपघात झाला असल्याचे निदर्शनास आले.
(३) पथदिव्यांची संचमांडणी योग्य देखभाल व दुरुस्ती न राखल्यामुळे विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग यांचेकडून शहर अभियंता, महानगरपालिका चंद्रपूर यांना दिनांक १३.०५.२०१६ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
चंद्रपूर महानगर पालिकेच्या निर्देशानुसार पथदिवे देखभाल व दुरुस्ती कामाचे कंत्राटदारामार्फत मृत व्यक्तीच्या वारसास रु. ३ लाख इतकी भरपाई देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील महावितरणचे विद्युत बॉक्स, फ्युज बॉक्स व ट्रान्सफॉर्मर रस्त्यात रहदारीच्या ठिकाणी बसविले असल्याबाबत

**(२३) ८५५९० (०९-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील धनकवडी, किरकीटवाडी, नांदेड, वारजे, कर्वेनगर, कोथरूड, आदी भागातील महावितरणचे विद्युत बॉक्स, फ्युज बॉक्स व ट्रान्सफॉर्मर उघड्या अवस्थेमध्ये असून बहुतांश ठिकाणी रस्त्यात रहदारीच्या ठिकाणी बसविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाच्या फायद्यासाठी ट्रान्सफॉर्मर रस्त्यात रहदारीच्या ठिकाणी बसविले असून अनेकवेळा तक्रार करूनही विद्युत विभागाकडून त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक विद्युत बॉक्स उघड्या अवस्थेमध्ये असून अपघात होण्याची शक्यता असल्याने शासनाने सदर प्रकरणी पाहणी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
विकासकासाठी ट्रान्सफॉर्मर उभारणी करतांना विकासकाकडूनच ट्रान्सफॉर्मरसाठी जागा घेतली जाते आणि त्या जागेतच विद्युतसंच मांडणीची उभारणी केली जाते.
(३) या भागातील महावितरणचे विद्युत बॉक्स उघडया अवस्थेमध्ये निदर्शनास आल्यास त्याची देखभाल व दुरुस्ती त्वरित करण्यात येते. तसेच अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच सदर तक्रारींवर त्वरीत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वीजेवर चालणा-या उपकरणांद्वारे "हार्मोनिक्स" म्हणजेच वीज यंत्रणेत प्रदूषण निर्माण होत असल्याबाबत

**(२४) *८५९०१ (०९-०८-२०१७).* श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीजेवर चालणा-या उपकरणांद्वारे “हार्मोनिक्स” म्हणजेच वीज यंत्रणेत प्रदूषण निर्माण होत असून यामुळे वीज ग्राहकांची विजेची उपकरणे, वाहिन्या अचानकपणे गरम होऊन स्विच सातत्याने बंद होऊन काही उपकरणे जळण्याचाही धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, महावितरण कंपनीने पुणे विभागामध्ये उच्च दाब वीज ग्राहकांना हार्मोनिक्सबाबत माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे प्रदूषण कमी करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम, २००५) मधील १२ वे कलम व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे

(कंडीशन्स ऑफ सप्लाय) मधील कलम १९ (पॉवर फॅक्टर/हार्मोनिक्स) नुसार पुणे परिमंडल अंतर्गत मे, २०१७ मध्ये साधारण १२४१ उच्चदाब वीज ग्राहकांना "हार्मोनिक्स" संदर्भात महावितरण कंपनीकडून नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रचलित वीज दरामध्ये हार्मोनिक्ससाठी ग्राहकाला दंड अथवा प्रोत्साहन याची तरतूद नसल्याने महावितरण कंपनीकडून हार्मोनिक्सचे नियमन करण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात नोटीस पाठविल्या जातात.
(४) हार्मोनिक्स हे विद्युत यंत्रणेत निर्माण होत असून त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्राहकाकडून त्याच्या विद्युत संच मांडणीमध्ये परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे, जसे की, उपकरणे बदलणे अथवा हार्मोनिक्स फिल्टर लावणे.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याबाबत**

**(२५) ८७१४८ (०९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत असून गंजलेले खांब, लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्या यामुळे वीज पुरवठयामध्ये अडथळा निर्माण होत आहे तसेच महावितरण कंपनीकडून सदर वीजपुरवठा सुरळीत करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालवण व कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) ग्राहकांची वीज देयके घेण्यासाठी महावितरणकडे असलेली यंत्रणा बंद असून वीज वितरण कार्यालयाकडून धनादेश स्वरुपातही वीज देयकाच्या रक्कमा स्वीकारल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार गंजलेले खांब, लोंबकळणा-या विद्युत वाहिन्या तात्काळ दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच वीज देयके नियमितपणे स्वीकारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) मे, २०१७ मध्ये झालेल्या वादळी वारा व पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील काही गावांमध्ये वीज पुरवठा वारंवार खंडित होत होता. जोराच्या वादळी वारा व पावसामुळे झाडाच्या फांदया, मोठी (लांब) झाडे उन्मळून वीज वाहिनीवर पडण्याचे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडल्याने वीजेचे खांब मोडणे, वाहक तुटणे इ. प्रकारामुळे वीज पुरवठयामध्ये अडथळा निर्माण होत होता.

दिनांक ०६.०५.२०१७ रोजी सावंतवाडी तालुक्यातील बांदा परिसरातील आलेल्या चक्रीवादळामुळे मोठया प्रमाणावर विद्युत वाहिन्यांवर झाडे पडून वीज पुरवठा खंडित झाला होता तसेच या कालावधीत आलेल्या अवकाळी पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्हयाच्या काही भागात वीज पुरवठा खंडित झाला होता. सर्व ठिकाणचा खंडित वीज पुरवठा, देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेऊन, सुरळीत करण्यात आला आहे.

(२) मालवण व कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) वीज बिलांचा भरणा करण्यासाठी ATP मशीन बसविण्यात आलेली होती. सदर मशीनच्या कंत्राटदाराबरोबरचा कंत्राट संपल्याने सदरची वीज बिल भरणा करण्याची यंत्रणा बंद आहे. परंतु मालवण व कणकवली तालुक्याच्या ठिकाणी महावितरणच्या उपविभागीय कार्यालयामध्ये वीज बिल भरणा केंद्रे सुरु केली असून तेथे रोखीने धनादेशाने वीज बिले स्विकारण्याची सोय केली आहे. तसेच मोबाईल ॲपद्वारे वीज बिल भरण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यात उच्चदाब वाहिनीचे एकूण ४३६ पोल व लघुदाब वाहिनीचे ३५९९ पोल बदलण्यात आले आहेत. कणकवली विभागातील गंजलेले खांब बदलण्याचे काम दिलेल्या ठेकेदाराने सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन आर्थिक वर्षामध्ये लघुदाब वाहिनीचे १६३५ खांब व उच्चदाब वाहिनीचे ८५ खांब बदलण्याचे काम केलेले आहे. कुडाळ विभागांतर्गत उच्चदाब वाहिनीचे ८७ पोल व लघुदाब वाहिनीचे १४५७ पोल बदलण्यात आले आहेत. कणकवली विभागांतर्गत लघुदाब वाहिनीचे १५९.८३२ किमी व उच्चदाब वाहिनीचे ७.४६५ किमी वाहक बदलण्यात आले आहेत. माहे मे महिन्यातील वादळी वारे व पाऊस यामुळे पोल मोडणे, वाहक तुटणे यासारखी परिस्थिती उद्भवू नये म्हणून विभागीय कार्यालय, कणकवली व कुडाळ यांचेकडून उच्चदाब व लघुदाब वाहिनी लगतच्या झाडाच्या फांद्या तोडण्यासाठी कामाचे आदेश स्थानिक ठेकेदारांना देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) तालुक्यातील वीज वितरण कंपनीने मागासवर्गीय शेतकऱ्यांकडून जोडणीसाठी पैसे घेऊन फसवणूक केल्याबाबत**

**(२६) *८८५७०* (०९-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागासवर्गीय शेतक-यांना विहिरीवरील विद्युत पंप व वीज जोडणी मोफत देण्याची योजना राबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरज तालुक्यात (जि.सांगली) वीज वितरण कंपनीने मागासवर्गीय शेतकऱ्यांकडून जोडणीसाठी पैसे घेऊन फसवणूक केल्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या विशेष कृती कार्यक्रमातंर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विहिरीवर बसविलेल्या कृषीपंपांना वीज जोडणी करिता शासनामार्फत विविध शुल्कापोटी (सर्व्हीस कनेक्शन चार्जेस, अनामत रक्कम, छाननी आकार) प्रती लाभार्थी रु. ६६५०/- याप्रमाणे निधी महावितरण कंपनीस देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सांगली जिल्हयात अनामत रक्कम घेऊन २३ ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर अधीक्षक अभियंता, सांगली यांनी त्यांच्या दि. २४.०५.२०१७ च्या पत्रान्वये ज्या लाभार्थ्यांकडून सुरक्षा ठेव घेण्यात आली आहे अशा २३ पैकी १७ लाभार्थ्यांना, त्यांनी भरणा केलेल्या अनामत रकमेचे त्यांच्या जून, २०१७ च्या वीज देयकातून कंपनीच्या नियमाप्रमाणे समायोजन करणेबाबतच्या सूचना, सर्व विभागीय कार्यालयांना दिल्या आहेत. आहेत. उर्वरित ६ लाभार्थ्यांनी सदर योजना जाहीर होण्यापूर्वीच अनामत रक्कम भरुन वीज जोडण्या घेतल्या आहेत. त्यामुळे त्यांना नियमानुसार रक्कम परत करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलगव्हाण, (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. संस्थेतील कामगारांकडून कूपतोडीचे काम करवून घेतले जात असल्याबाबत**

**(२७) ८८६२२ (१८-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जंगलालगत असणा-या आदिवासी व गैरआदिवासी वस्त्यांमधील नागरिकांना कामे मिळावी व वृक्षांची चोरी थांबावी या उद्देशाने जंगल कामगार सहकारी सोसायट्या अस्तित्वात आणून सोसायटींच्या सभासदांना काही प्रमाणात मोबदला देण्याची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलगव्हाण, (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. संस्थेकडून सभासद असणा-या मूळ कामगारांना बाजूला ठेवून शिवाणी, जबलपूर, मध्यप्रदेश येथील कामगार आणून वनविभागातील संस्थेस मिळालेले कूपतोडीचे काम करवून घेतले जात असल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे आदिवासी कामगारांच्या अधिकारावर गदा आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू संस्थेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०५-२०१८) :** (१) होय.

संस्थेच्या सभसदांमार्फत वन विभागाकडून वितरीत होणा-या कुप तोडणीचे कामकाज करणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. जंगल कामगार सहकारी संस्थेच्या सभासदांना १०% प्रोत्साहनात्मक अनुदान वाटप केले जाते.

(२) नाही.

मात्र, या संबंधात उप वनसंरक्षक, पुसद वन विभाग पुसद यांच्याकडे दि. ३०.३.२०१७ ला तक्रार अर्ज प्राप्त झाला होता.

(३) नाही.

(४) व (५) संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने उप वनसंरक्षक विभाग, पुसद मार्फत प्रत्यक्ष पंचासमक्ष पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान केलेल्या चौकशीत व कामगारांनी दाखविलेल्या ओळखपत्रावरून सदर मजूर हे जंगल कामगार सहकारी संस्था, बेलगव्हाण या संस्थेचे सभासद असल्याची खात्री झाली. यावरून इतर सभासदांनी कुप काम केली असल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील आश्रमशाळांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२८) ९०९१८ (०९-०८-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील मौजे पळसुंडा, कारेगाव, सूर्यमाळ, चास, गोंदे, हिरवे आणि घाणवळ येथील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या सात आश्रमशाळांची दुरवस्था झाली असून हजारो आदिवासी विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील प्रतिकूल परिस्थितीमुळे विद्यार्थी शिक्षण सोडून जात असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने मोखाडा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०५-२०१८) :** (१) पालघर जिल्हयातील जव्हार प्रकल्प कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या मोखाडा तालुक्यातील मौजे पळसुंडा, कारेगाव, सूर्यमाळ, चास, गोंदे, हिरवे आणि घाणवळ या आश्रमशाळांचे नवीन टाईपप्लॅन प्रमाणे इमारतीत सुरु असून, उर्वरीत पळसुंडे, सुर्यमाळ, चास, कारेगांव व घानवळ आश्रमशाळा हया जुन्या टाईपप्लॅन प्रमाणे असलेल्या इमारती (शेडसमध्ये) सुरु आहेत. सदर ठिकाणी विद्यार्थ्यांना निवास, पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, स्नानगृह, विद्युत व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

(२) व (३) सदर आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मानकाप्रमाणे व शासन निर्णयानुसार सकस आहार देण्यात येतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या व सोयीनुसार आवश्यक शालेय साहित्य व अन्य वस्तु खरेदी करण्याकरीता निधी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात देण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालक आश्रमशाळांमध्ये प्रवेशाकरीता आग्रही असतात. मोखाडा तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी वंचित राहू नयेत, याकरिता आदिवासी विद्यार्थ्यांना जवळच्या शासकीय अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश देण्यात येतो.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध असून मोखाडा तालुक्यांतर्गत आश्रमशाळेत विद्यार्थी शिक्षण सोडून गेल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या अमृत पोषण आहार योजनेबाबत**

**(२९) ९३४३७ (२१-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाला अमृत पोषण आहार योजनेसाठी शासनाने माहे मार्च, २०१७ अखेर सुमारे ११ कोटी रुपये मिळणे अपेक्षित असतांना शासनाने फक्त १ कोटी रुपये जिल्हा परिषदेच्या नाशिक जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या खात्यावर वर्ग केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील चार हजार अंगणवाडयांना बॅंकेकडून पैसै मिळत नसल्याने पोषण आहाराअभावी जिल्हयातील बालके उपाशी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाला अमृत पोषण आहार योजनेसाठी शासनाने माहे मार्च, २०१७ अखेर टप्पा १ साठी रुपये ५८८.३८ लक्ष व टप्पा २ अंतर्गत रुपये ४२८.९४ लक्ष असा एकुण रु.१०१७.३२ लक्ष (रु.१०.१७३२ कोटी) निधी महिला व बाल विकास अधिकारी यांचे अधिनस्त प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी थेट अंगणवाडी आहार समितीच्या बँक खात्यावर रक्कम जमा केलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालुक्यात घरगुती विज जोडणी देण्याबाबत**

**(३०) ९३६३६ (०९-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यात प्रलंबित घरगुती विज जोडणी तातडीने देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, अमरावती यांना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनातील तिन्ही अर्जदारांना डिसेंबर, २०१७ मध्ये घरगुती वीज पुरवठा देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सटाणा (जि.नाशिक) शहरात मोठ्या प्रमाणात होत असलेले भारनियमन**

**(३१) ९५६३७ (२९-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सटाणा (जि.नाशिक) शहरात मोठ्या प्रमाणात भारनियमन करण्यात येत असल्याने एका राजकीय पक्षातर्फे वीज वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयावर माहे सप्टेंबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात बैलगाड्यांद्वारे मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरासह ग्रामीण भागात वीजेचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे महावितरणकडून कोणतीही पूर्वसूचना न देता मोठया प्रमाणावर भारनियमन केले असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष व्यक्त होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार भारनियमन कमी वा रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) वीज निर्मिती केंद्राना कोळशाच्या उपलब्धतेत व पुरवठयामध्ये येत असलेल्या अडचणीमुळे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये दिनांक ०३.१०.२०१७ ते ०७.१०.२०१७ या कालावधीत मा. वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या निकषानुसार महावितरणमार्फत संपूर्ण राज्यात तात्पुरते भारनियमन करण्यात आले होते.
(३) माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये महावितरण कंपनीने सर्व स्त्रोतांकडून उपलब्ध असलेली वीज व मागणी यांचा ताळमेळ घालून देखील कोळशावर आधारित संच बंद पडणे, कोळसा कमी

उपलब्ध होणे याकारणांमुळे भारनियमनाची स्थिती निर्माण झाली होती. वरील अडचणींवर मात करण्यासाठी महावितरणकडून वीज उपलब्धता वाढविण्यासाठी वीजनिर्मिती कंपन्यांना सूचना देणे, संचांचे दुरुस्ती व देखभालाचे वेळापत्रक बदलणे, केंद्रीय वाटा व पॉवर एक्सेंज मधून अतिरिक्त वीज विकत घेणे, लघुकालिन निविदा प्रकाशित करुन त्याव्दारे वीज खरेदी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील विद्‌युत उपकरणांची झालेली दुरवस्था**

**(३२) ९५६३९ (२९-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई क्षेत्रात ठिकठिकाणी विद्‌युत उपकरणांची दुरावस्था झाली असून खराब झालेले डी.पी. बॉक्स, उघड्यावर पडलेल्या विद्‌युत तारा यामुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी विविध ठिकाणी भेटी देऊन दुरवस्था झालेल्या विद्‌युत उपकरणांच्या प्रतिमा काढून त्याचा संच मा. ऊर्जा मंत्री महोदयांना सादर करून याप्रकरणी त्वरित कार्यवाही करण्यात यावी म्हणून लेखी निवेदन माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शहरातील विद्‌युत प्रणाली बदलण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) वाशी व नेरुळ विभागात विद्‌युत वितरण प्रणाली ही सुमारे १५/२० वर्षापूर्वी उभारलेली असून त्यातील काही उपकरणे जुने, गंजलेले, नादुरुस्त व कालबाह्य झालेले आहेत. तसेच काही ठिकाणी फिडर पिलरचे दरवाजे व फिडर पिलरमधील फ्युजेस चोरुन नेले जातात. त्यामुळे काही ठिकाणावरील फिडर पिलर उघडया स्थितीत दिसतात.
(२) हे खरे आहे.
मा. लोकप्रतिनिधी यांचे अधीक्षक अभियंता, वाशी मंडळ यांना सादर केलेले दि. ९.०६.२०१७ चे निवेदन महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने शहरातील विद्‌युत प्रणाली बदलण्याच्या दृष्टीने सदर कार्यालयाकडून विविध देखभाल व दुरुस्ती कामाच्या निविदा देण्यात आल्या आहेत. तसेच एकात्मिक ऊर्जा विकास कार्यक्रम (IPDS) अंतर्गत सक्षमीकरण व आधुनिकीकरण (U&M) योजनेअंतर्गत विद्‌युत प्रणाली सुधारण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी भागातील खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायतीतील जांभूळवाडीमधील आदिवासी कुटूंब घरकूलापासून वंचित असल्याबाबत**

**(३३) ९६१२२ (२९-१२-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागातील खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायतीतील जांभूळवाडीमधील आदिवासी कुटूंब घरकूलापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, आदिवासी कुटूंबास घरकूल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०११ च्या सामाजिक, आर्थिक, जात निहाय सर्वेक्षणाच्या प्राधान्यक्रम यादीतील पात्र लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेने ब यादीला मंजुरी दिल्याप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत कर्जत तालुक्याला दिलेल्या लक्षांकाप्रमाणे टप्याटप्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची अंमलबजावणी चालु आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून वगळलेली परंतू ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,०००/-पेक्षा कमी आहे, अशा शबरी आदिवासी घरकुल योजनेकरीता पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या तीन वर्षाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये रायगड जिल्हयाकरीता वरील तीन वर्षाकरीता एकूण ३१९ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे. जांभुळवाडीमध्ये घरकुलासाठी एकच कुटुंब नव्याने विभक्त झाल्यामुळे घरकुलासाठी पात्र ठरलेले आहे. त्या कुटुंबास शबरी घरकुल योजना २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजुरीसाठी प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टेंभा (ता.शहापूर, जि.ठाणे) तालुक्यातील येथील शासकीय आश्रमशाळा दहिगाव येथे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(३४) ९७१२४ (२९-१२-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळा दहिगाव येथे हस्तांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवास (वन अधिकाराची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ चे कलम ३(२) अन्वये शासकीय आश्रमशाळा, टेंभा, ता.शहापूर करिता मौजे दहिगांव येथील ९९ आर जागा प्राप्त झाली असून जमिनीचा ७/१२ उतारा आश्रमशाळेच्या नावे झालेला आहे. शासकीय आश्रमशाळा, टेंभा, ता.शहापूर, जि.ठाणे येथे इमारत संकुल बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध झाल्यावर व इमारत तयार झाल्यानंतर सदरची टेंभा येथील आश्रमशाळा दहिगांव येथे स्थलांतरीत करण्यांत येईल. सद्य:स्थितीत टेंभा आश्रमशाळेसाठी मौजे दहिगांव येथील गट नंबर २०१७ च्या नियोजित जागेत २७५(१) अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून मंजूर झालेले संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरु करण्यांत आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुरडी (ता. आष्टी, जि. बीड) येथील बंद केलेली आश्रमशाळा तातडीने पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(३५) १००३७३ (२९-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील बंद केलेली आश्रमशाळा तातडीने पूर्ववत सुरु करण्याची मागणी शासनाकडे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जनतेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सूरडी येथील बंद करण्यात आलेली आश्रमशाळा तातडीने पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०५-२०१८) :** (१) सुरडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील बंद केलेली आश्रमशाळा तातडीने पूर्ववत सुरु करण्याची मागणीबाबतचे निवेदन कर्मचारी संघटनेकडून प्राप्त झाले आहे.

(२) शासकीय आश्रमशाळा, सुरडी, ता.आष्टी, जि.बीड या आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम फार पूर्वीचे असल्याने इमारतीचे अवस्था जीर्ण झालेली असून, संपूर्ण इमारतीची बऱ्याच मोठया प्रमाणात पडझड झालेली असल्याने सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि.बीड यांनी सदर इमारत वावरण्यास अयोग्य असल्याबाबत कळविले आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा, सुरडी या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्याने, ओटीएसपी क्षेत्र असल्याने, इमारत बांधकाम अंदाजपत्रकीय रक्कम फार मोठी असल्याने व जवळच्या शाळेमध्ये समायोजन शक्य असल्याने शासकीय आश्रमशाळा, सुरडी ही जवळच्या शासकीय आश्रमशाळा, थेटेगव्हाण येथे कायमस्वरुपी समायोजन करण्यांत आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय, खाजगी अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(३६) १००८४३ (२९-१२-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, खाजगी अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याबाबत निर्णय घेऊन एक वर्ष झाले तरी केवळ १४ टक्के आश्रमशाळांमध्ये ही यंत्रणा बसवण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) आल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०५-२०१८) :** (१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील सुरक्षेच्या दृष्टिने संनियंत्रणासाठी शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयास शासन स्तरावरुन सूचना करण्यांत आल्या होत्या. त्यानुसार शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व यंत्रणा बसविण्यासाठी तांत्रिक सर्वेक्षण माहे जुलै, २०१७ मध्ये करण्यात आले.

(२) व (३) शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा स्थापित करणे, माहितीचे संकलनासाठी सॉफटवेअर व त्यांचे वार्षिक देखभाल या बाबी GeM पोर्टलवरील खरेदीत शक्य नसल्याने सदर खरेदी ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदीस मान्यता देण्यात आली आहे. परंतु प्रथम पांढरकवडा प्रकल्पामध्ये सदर सीसीटीव्ही यंत्रणेची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना करण्यांत आली आहे. त्यानंतर तेथील अंमलबजावणीच्या अडचणी लक्षात घेऊन राज्यातील उर्वरित आश्रमशाळांमध्ये सदर प्रक्रियेची अंमलबजावणीबाबत आवश्यक त्या सविस्तर सूचना देण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने एफआरपीत वाढ केल्याने २,८०० रुपयांच्यावर प्रतिटन ऊस दर मिळणे अशक्य असल्याबाबत

**(३७) १०१३८९ (१०-०१-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने यावर्षी एफआरपीत प्रतिटन २५० रुपये वाढ केली असून तोडणी, वाहतूक यातून वजा होणार असल्याने यंदाही २,८०० च्यावर प्रतिटन ऊस दर मिळणे अशक्य आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रातील साखर कारखाने ऊसतोडणी व वाहतुक यंत्रणा खर्च स्वत: करीत असल्याने केंद्र शासनाने जाहीर केलेल्या ढोबळ FRP रक्कमेमधुन कारखान्यांनी केलेला ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणा खर्च वजा करुन निव्वळ FRP प्रमाणे दर ऊस पुरवठादारांना अदा करतात.

केंद्र शासनाने हंगाम २०१७-१८ करीता ९.५०% साखर उताऱ्यासाठी प्रतिटन रु.२५५०/- व त्यापुढील प्रत्येक १% साखर उताऱ्यासाठी प्रतिटन रु.२६८/- याप्रमाणे FRP दर जाहीर केलेला आहे. जो मागील हंगामाचे तुलनेने प्रतिटन रु. २५०/- जादा आहे. सन २०१७-१८ हंगामातील राज्याचा सरासरी साखर उतारा ११.५०% इतका अंदाजित करण्यात आलेला आहे. या अनुमानानुसार ढोबळ FRP रु.३०८६/- इतकी येते. हंगामातील राज्याचा सरासरी ऊसतोडणी व वाहतुक खर्च अंदाजे रु.६००/- प्रति मे.ट. वजा केल्यास राज्याची निव्वळ FRP रु.२४८६/- प्र.मे.ट. इतकी निघते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) १०३५३३ (०६-०१-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत यावर्षीचा २८ कोटींचा निधी मिळाला तरी ६ तालुक्यांनी अद्याप प्रस्ताव पाठवले नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निधी असतानाही विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रलंबित कामे पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०५-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) शासन शुध्दीपत्रक, दिनांक ०८ मार्च, २०१६ अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गतची कामे जिल्हा परिषद समाजकल्याण समितीच्या

मान्यतेने करण्याचे निर्देश असल्याने उपलब्ध निधीतून कामांना मंजूरी देण्यासाठी गांवांची निवड करण्याचा प्रस्ताव समाजकल्याण समितीपुढे ठेवण्यात आलेला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य शासनाने गेल्यावर्षी खरेदी केलेली ५ लाख २५ हजार क्विंटल तूरडाळ रेशन दुकानांतून विकण्याचा घेतलेला निर्णय**

**(३९) १०५७५४ (०४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने गेल्यावर्षी खरेदी केलेली ५ लाख २५ हजार क्विंटल तूरडाळ रेशन दुकानांतून विकण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार सर्व तूर डाळ रेशनदुकानातून विकली जाण्याची शक्यता कमी असल्याने ती खाजगी बाजारपेठेत तसेच मॉलमध्ये विक्री करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी आणि त्या डाळीचे दर पुन्हा ठरविण्याकरिता मा.पणनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदर अहवालातील तरतुदींच्या अनुषंगाने सर्वसामान्यांच्या लाभासाठी रेशनवरही तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-०५-२०१८) :** (१) होय.
(२) खुल्या बाजारात डाळीच्या किंमतीत MSP च्या जवळपास सुधारणा होण्याची परिस्थितीत रुपये ५५/-(MRP) प्रती किलो ग्रॅम या दरात बदल करणे यासाठी देखील मा.मंत्री(पणन्) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.
(३) मा.मंत्री(पणन) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अहवाल सादर करणे अपेक्षित नसून, बाजारभाव विचारात घेता तूरडाळीच्या दरात बदल करण्याचा निर्णय घेणे अपेक्षित आहे. दिनांक २३.०४.२०१८ पर्यत स्वस्त धान्य दुकानांमध्ये एकूण १,३२,४७३.२४ क्विंटल तूरडाळीचा पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांद्याच्या भावातील घसरण रोखण्यासाठी कांद्यावरील किमान निर्यात मूल्य कमी करून निर्यातीला प्रोत्साहन देण्याबाबत**

**(४०) १०६३५१ (२३-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांद्याच्या भावातील घसरण रोखण्यासाठी कांद्यावरील किमान निर्यात मूल्य कमी करून निर्यातीला प्रोत्साहन देण्याची मागणी नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री व मा.पणन मंत्री यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदा निर्यातीवरील निर्बंध हटविण्याकरिता राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-०५-२०१८) :** (१) होय.

(२) केंद्र शासनाच्या दिनांक २/२/२०१८ च्या अधिसूचनेन्वये कांदा निर्यातीवरील किमान निर्यात मूल्य शून्य केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर बाजार समितीच्या कांदा अनुदानात गैरव्यवहार केल्याची तक्रार दिल्याबाबत**

**(४१) १०६५५८ (१९-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर बाजार समितीच्या कांदा अनुदानात गैरव्यवहार केल्याची तक्रार कांदा उत्पादकांनी मा.राज्यमंत्री, कृषी व पणन यांचेकडे केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा उपनिबंधक यांनी चौकशी करण्याचे आदेश सहायक निबंधक यांना दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०५-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) होय, चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी अहवालात कांदा अनुदानात सकृतदर्शनी अपहार झाल्याचे नमूद केले आहे. त्या व इतर गैरव्यवहारांच्या मुद्द्याच्या अनुषंगाने श्रीरामपूर बाजार समितीचे सांप्रत संचालक मंडळ, सचिव व संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणप

(विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५(१) अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे लेखी व तोंडी म्हणणे पुराव्यासह ऐकून घेण्यासाठी दिनांक ११/५/२०१८ रोजी सुनावणी निश्चित केली आहे.सुनावणी अंती नियमानुसार दोषी सिद्ध झाल्यास संबंधितांविरुद्ध पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोतूळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे अवैधरित्या दारु विक्री होत असल्याबाबत.**

**(४२) १०७०८९ (०४-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोतूळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर दारुची विक्री होत असतानाही विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार कोतूळ परिसरात सुरु असलेली बेकायदेशीर दारु विक्रीवर बंदी घालणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे कोतूळ, ता.अकोले, जि.अहमदनगर या गावात राज्य उत्पादन शुल्क विभागाने ७ गुन्हे नोंदवून ७ इसमांना अटक केली आहे. तसेच, पोलीस विभागाने ११ गुन्हे नोंदवून १३ इसमांना अटक केली आहे.

(३) राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाकडून संयुक्त मोहिमेचे आयोजन करून अवैध दारू धंद्याविरोधात वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, अवैध दारू विक्रीस प्रतिबंध घालण्यासाठी सदर गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याच्या प्रक्रियेची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून संबंधितांना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी उपयोजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेची अट शिथिल करण्याबाबत**

**(४३) १०७१२६ (१८-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणेसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेची अट शिथिल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांना लेखी पत्राद्वारे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(३) असल्यास, चौकशीअंती आदिवासी उपयोजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणेसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०५-२०१८) :** (१), (२) व (३) आदिवासी शेतकऱ्यांसाठीच्या विविध कृषी विषयक योजनेंमध्ये कृषि विभागाने त्यांच्या दिनांक ०९.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा केली होती. सदर शासन निर्णय आदिवासी शेतकऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अट घालण्यांत आली होती. तथापि सदर शासन निर्णयातील जात वैधता प्रमाणपत्राची अट शिथील करुन केवळ जात प्रमाणपत्र सादर करण्याची अट ठेवण्याबाबत आदिवासी विकास विभागाने कृषि विभागास सूचीत केले. त्यास अनुसरून कृषि विभागाने त्यांच्या दिनांक ३०.१२.२०१७ च्या शासन पुरक पत्रान्वये सुधारणा केल्या असून जात प्रमाणपत्र असणे आवश्यक केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळाच्या शहापूर उपप्रादेशिक (जि.ठाणे) कार्यालयाच्या दोन वर्षातील भात खरेदीच्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत**

**(४४) ११०५८७ (१८-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाच्या शहापूर उपप्रादेशिक (जि.ठाणे) कार्यालयाकडून दरवर्षी करण्यात येणारी भात खरेदी नियमबाहय केली जात असून या कार्यालयाच्या दोन वर्षातील भात खरेदीच्या गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी सरळांबे ग्रामस्थांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-०५-२०१८) :** (१) हे अशंतः खरे आहे. श्री. भगवान महादू हुमणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडे दि. २५.०१.२०१७ व दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शहापूर खरेदी केंद्र कानविंदे येथे बेकायदेशीरपणे हलविणे व इतर मुद्यांबाबत तक्रार अर्ज दिलेला आहे.

(२), (३) व (४) तक्रार अर्जातील सर्व मुद्यांबाबत प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांनी दि. १२.१०.२०१७ रोजीच्या पत्रानूसार श्री. हुमणे यांना उत्तर दिले आहे. त्यानुसार महामंडळाकडे याबाबत चौकशी करुन नियमबाह्य खरेदी केंद्र हलविणे, कागदपत्रांची पुर्तता न करणे, गोडाऊनमध्ये जादा माल साठविणे इत्यादी तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे अर्जदारांना कळविले आहे.

---

### अमरावती जिल्हयात शासकीय तूर खरेदी केंद्र सुरु करणेबाबत

**(४५) ११०५९० (२३-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने तूर खरेदीसाठी ५ हजार ४५० रुपये प्रती क्विंटल भाव जाहीर केला असताना राज्यात मात्र हमी भावापेक्षा सुमारे एक ते दीड हजार कमी दराने तूर खरेदी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयात अद्याप शासकीय तुर खरेदी केंद्र सुरु न केल्याने शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांना अवाजवी दरात तूर विकावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र शासनाने जाहीर केलेल्या दराने तूर खरेदी करण्यासाठी व अमरावती जिल्हयात शासकीय तुर खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०५-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.

अमरावती जिल्हयात हमीभावाने तूर खरेदी दिनांक १/०२/२०१८ पासून सुरु करण्यात आली आहे. या जिल्हयातील एकूण ९ खरेदी केंद्रांवर दिनांक ९/०५/२०१८ पर्यंत २१७०३ शेतकऱ्यांकडून ३५६७५८ क्विंटल तूरीची खरेदी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाने कांद्यावर प्रतिटन ८५० डॉलर इतके किमान निर्यातमुल्य लावल्यामुळे सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याच्या दरात झालेली घसरण**

**(४६) ११०९९५ (२३-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने कांद्यावर प्रतिटन ८५० डॉलर इतके किमान निर्यातमुल्य लावल्यामुळे सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याच्या दरात प्रचंड प्रमाणावर घसरण झाल्याचे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची उलाढाल राज्यात आघाडीवर असून सोलापूर येथून कर्नाटक, आंध्रप्रदेश व दक्षिण भारतातील राज्यात कांदा पाठविला जातो, परंतु निर्यातमुल्य लावल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-०५-२०१८) :** (१) नाही.

(२) किमान निर्यातमूल्य हे परदेशात निर्यात करावयाच्या कांद्यासाठी लागू केलेले आहे. सदर निर्यातमूल्य देशांतर्गत कांद्याच्या व्यापारात लागू नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने मळी वाहतूक परवाना शुल्क म्हणून आकारण्यात येणारे प्रतिटन एक रुपया शुल्क सुमारे पाचशे पट वाढविल्याबाबत**

**(४७) १११७३१ (१८-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाने मुंबई मळी नियम, १९५५ अंतर्गत नियम १३(१), १५(१) व १९(१) मध्ये केलेल्या सुधारणांचे परिपत्रक काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिपत्रकात मळी वाहतूक परवाना शुल्क म्हणून आकारण्यात येणारे प्रतिटन एक रुपया शुल्क सुमारे पाचशे पट वाढवून प्रतिटन ५०० रुपये आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामूळे कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखान्यांना ४० कोटींची अतिरिक्त आर्थिक तरतूद करावी लागणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०५-२०१८) :** (१) व (२) होय. याबाबतची शासन अधिसूचना दि.१ नोव्हेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) मुंबई मळी नियम, १९५५ अंतर्गत नियम १३ (१)-आयातीकरीता, १५ (१)-निर्यातीकरिता व १९ (१)-मळीवाहतूकीकरीता, शुल्क आकारणी केली जाते. सदर नियमावलीप्रमाणे, जो अर्जदार असतो त्याच्याकडून सदर आयातीकरिता, निर्यातीकरिता व मळी वाहतुकीकरीता शुल्क शासकीय कोषागारात जमा करून घेण्यात येते. परंतू, साखर कारखान्यांनी, ज्या घटकांना मळी वितरीत करण्यात येते त्याच्या अंतिम बीजकामध्ये (सर्व करांसहीत) सदर शुल्काची वसूली करून घेतल्यास कारखान्यांना कोणत्याही अतिरिक्त स्वरुपाची आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता लागणार नाही.

(४) उक्त शासन अधिसूचनेस साखर कारखाने व एम अनुज्ञप्तीधारक घटकांकडून मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करून आव्हान दिले असून सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिले आहेत. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलदरा आणि धारणी (जि.अमरावती) पंचायत समितीमध्ये पेसा कायद्यांतर्गत चौकशी पथकाकडून सखोल चौकशी केली नसल्याबाबत**

**(४८) १११८३७ (१८-०४-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागातील चिखलदरा आणि धारणी (जि.अमरावती) पंचायत समितीमध्ये पेसा कायद्यांतर्गत झालेल्या कोट्यावधींच्या वादग्रस्त साहित्य खरेदीची विभागीय आयुक्तांच्या चौकशी पथकाकडून चौकशी केली गेली मात्र ग्रामपंचायतीने याबाबत तयार केलेल्या ठरावाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार ठरावाची दखल न घेउन सखोल चौकशी न करणा-या अधिका-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) यासंदर्भात चौकशी समिती गठीत करण्यात आली असून त्याअतंर्गत पंचायत समिती धारणी व पंचायत समिती चिखलदरा अंतर्गत ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक यांची

सुनावणी ठेवण्यात आली असून सुनावणी पुर्ण होताच जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून दोषी व्यक्तींवर प्रशासकिय कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्द्भवत नाही.

---

**श्री क्षेत्र सप्तशृंगगडावर (जि.नाशिक) पाच ते सहा ठिकाणी अवैध दारुविक्री होत असल्याबाबत**

**(४९) ११२११७ (१८-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र सप्तशृंगगडावर (जि.नाशिक) प्लास्टिक मुक्त मोहिम राबविण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी कळवन (जि.नाशिक) यांनी प्रांत अधिकाऱ्यांसह माहे जानेवारी, २०१८ या कालावधीत घेतलेल्या बैठकीच्या वेळी अवैध मद्य साठा जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सप्तश्रृंगी गडावरील पोलीस चौकीच्या शेजारीच अवैधरित्या दारु विक्री केली जात असून याबाबत शासनाने अधिकची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार अवैध दारु विक्री करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०५-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कळवण विभाग, जि.नाशिक यांचे पथकाने दि.२९.०१.२०१८ रोजी केलेल्या कारवाईमध्ये मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ अन्वये गु.र.क्र. २१/२०१८ नोंदविला असून एक महिला आरोपीला ताब्यात घेण्यात आले व रु. १०,१९४/- किंमतीचे मद्य जप्त करण्यात आले आहे. तसेच, पोलीस विभागाकडून कळवण पोलीस ठाणे, जि.नाशिक यांनी जानेवारी, २०१७ ते २७ एप्रिल, २०१८ अखेरपर्यंत सप्तश्रृंगी गडावरील परिसरात एकुण ९२ गुन्हे नोंदविले असून रु.१,३६,८३६/- किंमतीचे मद्य जप्त केले आहे. यामध्ये, सप्तश्रृंगी गडावर नोंदविण्यात आलेल्या १६ गुन्ह्याचा समावेश असून याप्रकरणी १६ इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. सप्तशृंगीगड परिसरात वेळोवेळी गस्त घालून व सामुहिक धाडसत्र आयोजित करून अवैध दारू वाहतूक व विक्रीबाबत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दमण, दादरा व  हवेली या परिसरातून नाशिक जिल्ह्यात**
**होणारी मदयाची अवैध वाहतुक**

**(५०) ११५२८८ (०४-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मद्याची चोरटी वाहतूक, गावठी दारु निर्मिती व विक्री यावर कठोर कारवाई करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने सन २०१७-१८ या वर्षात ९ महिन्यात छापे टाकून दाखल केलेल्या गुन्हयांमधील ७७४ गुन्हयांमधील संशयित अद्याप भरारी पथकास सापडलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात दमण, दादरा व हवेली येथे कर नसल्याने मद्याचा अवैध व्यापार होत असून शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छाप्यामधील गुन्हेगार न सापडण्याची कारणे काय आहेत तसेच अवैध दारु वाहतूक व विक्री रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कारवाईची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०५-२०१८) :**(१) अंशतः खरे आहे. राज्यात अवैध दारूची निर्मिती/विक्री/वाहतूक करणाऱ्याविरूध्द राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे एप्रिल, २०१७ ते माहे डिसेंबर, २०१७ या कालावधीत एकूण ३३,३८६ गुन्हे नोंदविले असून १८,९४२ वारस गुन्हे आहेत. तर १४,४४४ गुन्हे बेवारस आहेत. यामध्ये एकूण १९३९२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नाशिक जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून उक्त कालावधीत एकूण १७२७ गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी ९५३ गुन्हे वारस आहेत. यामध्ये एकूण ९८९ आरोपींना अटक करण्यात आली असून ८२ वाहनांसह सुमारे रु.२.०३ कोटी रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ७७४ गुन्ह्यात आरोपी निष्पन्न झालेले नाहीत. उक्त एकूण गुन्ह्यामध्ये भरारी पथकाने उक्त कालावधीत एकूण ६५१ गुन्हे नोंदविले असून ३१३ गुन्हे वारस आहेत व त्यामध्ये ३४१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित ३३६ गुन्हयात आरोपी निष्पन्न झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून नोंदविण्यात आलेल्या बेवारस गुन्हयापैकी बहुतांश गुन्हे हे हातभट्टी दारू निर्मितीची असून दारू निर्मितीची ठिकाणे ही दुर्गम, नदी, नाले किनारी असल्याने आरोपी वाहन, मुद्देमाल टाकून पलायन करीत असल्याने आरोपी निष्पन्न होत नाही. मद्याचा चोरटा व्यापार रोखण्यासाठी वेळोवेळी गुप्त बातमीदारामार्फत बातमी काढून गुन्ह्यांचा शोध लावून गुन्हे नोंदविण्यात येत आहेत. मद्याचा चोरटा व्यापार रोखण्याकरीता सीमा तपासणी नाके अद्यावत करणे, सामुहिक धाडसत्र आयोजित करणे, रात्रीची गस्त घालणे, टोल नाक्यावर तसेच अचानक संशयित वाहने तपासणे इ. कारवाई केली जाते. मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली

जाते. अवैध मद्य विक्रीस आळा घालण्यासाठी जनतेला तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक व व्हॉटस अप क्रमांक प्रसिध्द करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाकडून संयुक्त मोहिमेचे आयोजन करून अवैध दारू धंद्याविरोधात वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**